The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# 'लोळणफुगडी' या काव्यसंग्रहातील विठ्ठल दर्शन

**कोमल बालाजी भरणे**
(संशोधक विद्यार्थीनी )
भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**प्रस्तावना :-**

आपली महाराष्ट्र भूमी ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रामध्ये भागवत धर्माची पताका तेवत ठेवण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले आहे. पंढरपूरचा विठ्ठल हा या वारकऱ्यांचा दैवत आहे. आषाढी कार्तिकी महिन्यात वारकऱ्यांच्या दिंड्या पंढरपूरच्या दिशेने निघतात. कवी श्रीकांत देशमुख हे मातीशी नाळ जोडलेले एक कवीमन आहे. त्यांचे बालपण शेत शिवारात गेले. ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांनी शेतीला,काळ्या आईलाच विठ्ठल मानले. श्रीकांत देशमुख यांनी आपल्या कवितेतून शेतकऱ्यांच्या मनातली विठ्ठल प्रतिमा साकारली आहे. त्यांचा 'लोळणफुगडी' हा काव्यसंग्रह एखाद्या अभंगावली सारखा आहे. वारकरी संप्रदायाचे आणि विठ्ठलाची साकाररूप त्यांनी या कवितासंग्रहातून साक्षात केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचा हेतू हा श्रीकांत देशमुख यांच्या लोळणफुगडी या काव्यसंग्रहातून विठ्ठल दर्शन अभ्यासणे हा आहे.

**'लोळणफुगडी' या काव्यसंग्रहातील विठ्ठल दर्शन :-**

कवी श्रीकांत देशमुख हे ग्रामीण कवी आहेत. त्यांची गावातल्या मातीशी आणि माणसांशी नाळ जोडली आहे. वडिलोपार्जित कोरडवाहू शेती करीत असताना श्रीकांत देशमुख यांनी आपल्या बापाचे कष्ट साक्षात पाहिले आहेत. श्रीकांत देशमुख यांना आपला बापच विठ्ठल वाटतो. श्रीकांत देशमुख यांनी शेतशिवाराला, काळ्या मातीला आपल्या कवितेतून विठ्ठलमय केले आहे. त्यांच्या कवितेविषयी जेष्ठ समीक्षक भालचंद्र नेमाडे लिहितात, "कवीमधल्या वारकरी जाणिवेचेच एक अतिसंवेदनशील रूप आहे...एखाद्या आधुनिक कवीने विठ्ठल आणि वर्तमान गावगाडा समोर ठेवून अतिशय व कृत्रिमरित्या लिहिलेली मराठी भाषेतील हे पहिलीच रचना आहे."[१] ज्येष्ठ समीक्षक भालचंद्र नेमाडे यांनी श्रीकांत देशमुख यांच्या कवितेविषयी केलेले विधान रास्त ठरते.

विठ्ठलाची आळवणी करत असताना शेतकऱ्यांची दुःख, वेदना सांगत असताना प्राणीमात्रांचे आणि वृक्षवेलींचे दुःख मांडत असताना कवी विठ्ठलाला उद्देशून लिहितात,

" बा विठ्ठला तुझ्यावर कविता लिहू म्हणतोय पुन्हा
देव्हाऱ्यातल्या मंदवातीसारखं स्थैर्य लाभू दे हाताला
गावोगावीचे कोरडे भकास नदीनाले
माणसं जीवजित्राबाला वाहून नेणारे अजस्त्र पूल

वसंतातली पानांची कोवळी सळसळ
पोपटी गवताची वाट पाहत
माळरानावर तोंड घासणारी गुरंढोरं
या साऱ्यांवर पांगलंय मृगाचं हे उदास आभाळ" (पृष्ठ-११)

प्रस्तुत कवितेतून कवी श्रीकांत देशमुख यांनी पंढरपुरातल्या विठ्ठलाला विनवणी केली आहे. पूर्वीसारखे गाव आता सधन राहिले नाहीत. गावगावचे नदी-नाले भकास आणि कोरडे झाले आहेत. गावातली माणसं जनावरांना दुष्काळाच्या कचाट्यातून वाचवण्यासाठी हतबल झाले आहेत. वसंत ऋतुतल्या पानांची कोवळी सळसळ हिरव्या गवतांची वाट पाहत आहेत. उन्हाच्या कडक दाहकतेमुळे माळरान करपून गेले आहे. त्यामुळे गुराढोरांचा चारा संपुष्टात आला आहे. निसर्गचक्रामधील आभाळी पावसाचे नक्षत्र रुसले आहे. म्हणून कवी श्रीकांत देशमुख हे विठ्ठलाला विनवणी करतात. या चराचर जीवसृष्टीला, मानव जातीला, शेतकऱ्यांना देव्हाऱ्यातल्या मंद वातीसारखं स्थैर्य लाभू दे. विठ्ठलासोबत कलह करण्याची पद्धती वारकरी संप्रदायामध्ये संत कर्ममेळापासून सुरू झाली आहे. संत तुकारामांनी ही पद्धती कळसापर्यंत नेली. तर कवी श्रीकांत देशमुख यांनी 'लोळणफुगडी' या कविता मालिकेची सुरुवात संत कर्ममेळाच्या संतप्त प्रश्नांनी केली आहे. **'वावग्या येरझाऱ्या किती माराव्या दातारा?'** गेली सातशे वर्ष कमरेवर हात ठेवून नुसतं उभे राहण्याचा दुर्धर उद्योग सांभाळणाऱ्या विठोबाला ह्याच प्रश्नाचे उत्तर देता आलं नाही. "आजच्या पिढीच्या दर मोसमात अस्मानी-सरकारी संकटांना तोंड देत दरसाल लुबाडले जाणारे अनुवंशिक दारिद्र्याने गांजलेले शोषित वारकरी, शेतकरी, एंड्रीन पिऊन फासावर तडफडत दररोज मरत असतात. तरी या विठोबाला आपल्या सुखदु:खाचे वाटेकरी करूनच जगत राहतात कशामुळे? देशमुख यांची कविता म्हणते, 'गळफास आवळलेल्या नरड्याचा दाह पोहोचो तुझ्या रत्नजडित कंठापर्यंत.' हा वारकरी संतकाव्यातला करुणेचा आर्त स्वर या कवितेतून ओळीओळीतून उमटलेला आहे.'[२] विठ्ठलाने विटेवर उभे राहण्याला श्रीकांत देशमुख हे समंजस व्यापारी उभेपण असे म्हणतात. आणि विशेष म्हणजे तसे उभे करणाऱ्या पांडुरंगालाही तू विठ्ठलाला इतकी पक्की वीट का दिली. **"कारे पुंड्या मातलासी उभे केले विठ्ठलाची"** असे संत तुकारामांनी एकदा कौतुकाने विचारले होते. परंतु श्रीकांत देशमुख यांनी विठ्ठलाला प्रश्न विचारला आहे.**"विटेवर उभ राहून, कमरेवर हात देण्यापासून त्याचं नातं आपल्या आसमंतातील जीवजित्राबापासून कायमचं तुटलंय रे पुंडलिका कुठं फेडशील हे पाप कोणत्या जन्मी?"** सावतामाळी यांच्या प्रतिमांचा वापर करून कवी श्रीकांत देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या कष्टाचे वर्णन केले आहे.

**" आमची माळीयाची जात**
**शेत लावू बागायत**
**सावता भिडला आभाळा**
**रक्तामासाचा दहीकाला**
**पताकांचा गाळ**
**भिडला थेट मातीला" (पृष्ठ-१८)**

गावातल्या पारावर चालत असलेल्या कीर्तनाचे वर्णन करत असताना वारकरी संप्रदायाला मोठे करणारे श्रेष्ठ संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांचा जयघोष होतो आणि या जयघोषातून गावातल्या बैलांच्या गळ्यात वाजणाऱ्या घुंगरांचा एकाच पट्टीतला आवाज दोघांचेही महात्मे सांगून जातो.

**" दूरवर कोल्हे कोई**
**पारावर रामकृष्ण भगवान की जय**
**ज्ञानोबा माऊली तुकारामाचा गजर**
**मध्येच चारा चिवडताना येणारा**
**बैलांच्या गळ्यातल्या घुंगरमाळांचा**
**किणकिण आवाज" (पृष्ठ-२०)**

संत कर्ममेळ्याने ज्याप्रमाणे विठ्ठलाशी कलह केला, त्याचप्रमाणे कवी श्रीकांत देशमुख यांनी माणसांच्या जीवासाठी मुक्या जनावरांसाठी विठ्ठलाची कलह केला आहे. विठोबा हा जगाचा निर्माता आहे. तो सर्वज्ञात आहे. विठ्ठल माऊलीने विविध परोपकारी साधुसंतांचे अनमोल वचन सामान्य जनापर्यंत पोहोचण्यासाठी, सामान्य जणांच्या सदाचरणासाठी, कल्याणासाठी व मांगलयासाठी स्वामी चक्रधर, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व संत नामदेव या संत मंडळींचे अध्यात्मिक कार्य श्री विठ्ठलाद्वारेच झाले आहे. यापुढेही जाऊन कवी श्रीकांत देशमुख यांनी भगवान गौतम बुद्ध, महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक थोर व समाजहित दक्ष लोककल्याणकारी काम करणाऱ्या या महापुरुषांमध्येही विठ्ठलाचे अस्तित्व दिसून येते. याविषयी श्रीकांत देशमुख लिहितात,

**" विठोबानेच पेरले होते म्हणतात शतकाशतकात**
**बुद्ध चक्रधर गांधी लिंकन ज्ञानोबा तुकोबा नामा एका**
**बंका सेना जना मार्क्स फुले विठ्ठल रामजी गाडगेबाबा**
**आंबेडकर भाऊराव**
**शतावतार विठोबाचे" (पृष्ठ-२७)**

कवी श्रीकांत देशमुख यांनी आपल्या कवितेतून संतांना एकत्र आणण्यासाठी नामसंकीर्तन घडवून आणले आहे. त्यासाठी त्यांनी ढोक महाराज, निवृत्ती महाराज, बाबा महाराज या संताना एकत्रित केले आहे. जणू त्यांची पाठशाळा सुरू केली आहे. किंबहुना ती संकीर्तनाची बालवाडीच भरली आहे. हे संकीर्तन या पृथ्वीवर चारही बाजूंनी सुरू आहे. या संकीर्तनाचा आवाज दऱ्याखोऱ्यातून, वाडीवस्तीतून, नदीकाठी सगळीकडे गुंजत आहे. म्हणून कवी श्रीकांत देशमुख आपल्या कवितेतून लिहितात,

**"ऐकू येतंय चहूबाजूंनी**
**दऱ्या खोऱ्यातून नदीकाठ वाडीवस्त्यातून**
**तुझं नामसंकीर्तन**

**बाबा महाराज, ढोक महाराज, निवृत्ती महाराज**
**किती किती लोक घेताहेत पाठशाळा**
**बालवाडी संकीर्तनाची**
**तोहा माधव बरवा,तो हा विठ्ठल बरवा" (पृष्ठ-३८)**

कवी श्रीकांत देशमुख विठ्ठलाला आर्त हाक देतात. श्री विठ्ठलाला जाणिवेने मी तुझ्यावर कविता लिहीत आहे, असे अभिमानाने सांगतात. विठ्ठलाच्या ठिकाणी असलेली निष्ठुरता, त्यांच्या देव्हाऱ्याला लागलेल्या आगेची धग कवीलाही मिळावी यासाठी ते विठ्ठलाचा आटापिटा करतात,धावा करतात. म्हणून आपल्या कवितेतून कवी लिहितात,

**" बा विठ्ठला**
**तुझ्यावर कविता लिहितोय**
**तुझ्यासारखीच निष्ठुरं**
**देव्हाऱ्याला लागलेल्या आगीची ढग**
**येवो माझ्या हातात" (पृष्ठ-४७)**

'लोळणफुगडी' या विठ्ठलमय झालेल्या काव्यसंग्रहाबद्दल कवी श्रीकांत देशमुख लिहितात, "संत साहित्याने इथल्या कृषक समाजाला जे बळ दिलंय ते अलौकिक स्वरूपाचे आहे. माझेही भरणपोषण याच वारकरी परंपरेने केले आहे. या परंपरेवर डोळस श्रद्धा आहे. मन अबीर भुक्क्याने माखून घ्यावे म्हणून गेल्या काही वर्षांपासून मी चार-दोन दिवस का होईना पायी वारीत जातो. मातळल्या मनाची ती प्रचंड गर्दी मी तिचा भाग होऊन बघितली. मन विठ्ठल झाल्याचा अनुभव मी या काळात घेतला. चंद्रभागेच्या पाण्यात न्हाऊन आलो. या काळातला दिवस, रात्र, सकाळ, मध्यरात्र, हरेक क्षण मनःपूर्वक अनुभवला."[3] संत परंपरेविषयी, संत साहित्यविषयी आणि या साहित्याचा कृषक जीवनविषयी असलेला संबंध कवी श्रीकांत देशमुख यांनी प्रतिपादित केला आहे. पंढरपूरातल्या चंद्रभागेच्या कठी विठ्ठल मंदिरात पंढरपुराच्या भूमीत जी वारकरी मंडळी पाहिली, अनुभवली त्यामुळे कवी श्रीकांत देशमुख विठ्ठलमय वातावरणात रंगून गेले. विटेवरी असलेल्या श्री विठ्ठलाचे त्यांनी गोडवेही गायले आणि त्यांच्यासमवेत कलह सुद्धा केले. श्रीकांत देशमुख यांच्या ठिकाणी असलेले संत मनही उजागर होते. नव्हे, श्रीकांत देशमुख हे स्वतःच संत होऊन संतवाणी प्रकटत आहेत असे जाणवते. त्यांच्या मनामध्ये विठ्ठल वास करतो. तो विठ्ठल सहृद्यातून प्रकटतो. तो विठ्ठल शेतकऱ्यांचे रूप घेतो, कष्टकऱ्या बापाचे रूप घेतो, सामान्यजणांचे रूप घेतो, दिंडीत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांचे रूप घेतो. त्यांच्या सर्व कविता ह्या विठ्ठलभक्तीने ओतपोत झाल्या आहेत. जणू या कवितांच्या प्रत्येक ओळीतून विठ्ठलाचेच दर्शन घडते. अशाप्रकारे श्रीकांत देशमुख यांच्या लोळणफुगडी या काव्यसंग्रहात पंढरपुरातल्या विठ्ठलाचे आणि वारकरी संप्रदयाचे वास्तव दर्शन घडते.

**निष्कर्ष :-**

१) श्रीकांत देशमुख यांच्या 'लोळणफुगडी' या काव्यसंग्रहातून वारकरी संप्रदायाचे आणि विठ्ठलाचे मनोरम दर्शन घडते.

२) 'लोळणफुगडी' या काव्यसंग्रहातून महाराष्ट्रातील विविध संतांनी भागवत धर्माची पताका व कीर्ती महाराष्ट्रात सर्वदूर पसरविली.

३) श्रीकांत देशमुख यांनी 'लोळणफुगडी' या काव्यसंग्रहातून विठ्ठलाची महती सांगितली, गोडवे गायले तसेच त्यांनी त्यांच्याविषयीचा त्रागा आणि कलह व्यक्त केला आहे.

४) श्रीकांत देशमुख यांनी संत साहित्याचे महात्मे त्यांच्या कवितातून प्रकट केले आहे.

५) श्री विठ्ठलाच्या प्रतिमांचा वापर करून श्रीकांत देशमुख यांनी या चराचरसृष्टीतल्या मानव, प्राणी, पशु-पक्षी झाड, वेली यांच्यातील विठ्ठलाचे रूप दाखवले आहे.

६ ) श्रीकांत देशमुख यांच्या लोळणफुगडी या काव्यसंग्रहामुळे मराठी संत साहित्य समृद्ध झाले आहे.

**संदर्भसूची :-**

१) देशमुख श्रीकांत- लोळणफुगडी- (कवितासंग्रह), प्र. आ. २०२०, पृष्ठ-१४५

२) जाधव समृत- (संपा.) झाडमाणूस, श्रीकांत देशमुख गौरव ग्रंथसमिती, लातूर, प्र.आ.२०२१ पृष्ठ-३२

३) देशमुख श्रीकांत- लोळणफुगडी (कवितासंग्रह), प्र.आ. २०२०, पृष्ठ-१५६

**'लोळणफुगडी' या काव्यसंग्रहातील विठ्ठल दर्शन**

**कोमल बालाजी भरणे**